३९

**मंत्रालयीन विभागांमध्ये बदली झालेल्या सहायकांने कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीच्या परीक्षेकरिता घ्यावयाच्या विभागीय विषयांबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
शासन परिपत्रक क्रमांक :परीक्षा -१२०९ /प्र.क्र.३५/०९/१७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
**दिनांक १९ डिसेंबर, २००९**

**परिपत्रक :-**

मंत्रालयीन विभागामध्ये बदलीच्या कायदयानुसार सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या / अधिकाऱ्यांच्या एका विभागातून दुसऱ्या विभागात बदल्या केल्या जातात. बदलीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर काही कर्मचाऱ्यांना संबंधित विभागाकडून तात्काळ कार्यमुक्त केले जात नाही, असे दिसून आले आहे. अशा परिस्थितीत बदली झालेल्या सहायकाचा कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीच्या विभागीय परिक्षेसंबंधीचा विहित नमुन्यातील अर्ज, तो सहायक कार्यमुक्त झालेला नसल्याने, एका विभागाकडून पाठविण्यात येतो आणि तदनंतर परीक्षेचा कार्यक्रम जाहीर करण्याच्या दरम्यान तो दुस-या विभागात कार्यरत असल्यास त्यावेळी कोणत्या विभागाच्या विभागीय विषयांची परीक्षा द्यावी असा प्रश्न त्याच्यापुढे निर्माण होतो. त्यामुळे संबंधित सहायकाकडून या संदर्भात या विभागाकडे विचारणा करण्यात येते. या बाबीचा साकल्याने विचार करुन, सर्व प्रशासकीय विभागांना असे सूचित करण्यात येत आहे कि, बदली झालेल्या सहायकाचे विभागीय अर्हता परीक्षेच्या प्रशिक्षणाबाबतचे /परिक्षेबाबतचे अर्ज, तो त्यावेळी कार्यरत असलेल्या विभागाकडून जरी पाठविण्यात आले असले तरी त्या वर्षीच्या परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यासंबंधीचे परिपत्रक या विभागाकडून निर्गमित होण्यापूर्वी (जाहीर करण्याच्या दिनांकापर्यंत) असा सहायक बदलीने अन्य विभागात रुजू झाला असेल तर संबंधित सहायकास बदलीनंतरच्या विभागाच्या विभागीय विषयांची परीक्षा देणे आवश्यक राहील. तथापि जो सहायक त्या वर्षीच्या परीक्षेच्या तारखा जाहिर करण्यासंबंधीचे परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर बदलीने नवीन / दुसऱ्या विभागात रुजू झाला असेल तर त्या सहायकाने त्याच्या बदलीपूर्वीच्या विभागातील विभागीय विषयांची परीक्षा देणे आवश्यक राहील. मात्र वरील निदेश विचारात घेवून आवश्यक ती खातरजमा करण्याची व त्यानुसार विभागीय विषयांच्या प्रश्नपत्रिका पुरेशा संख्येने सामान्य प्रशासन विभाग / कार्या.१७ कडे उपलब्ध करुन देण्याची व अशा प्रश्नपत्रिका पाठविताना सदर बाब विशेषत्वाने

सामान्य प्रशासन विभागाच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी संबधित सहायकाच्या बदलीपूर्वीच्या मूळ विभागाची राहील. त्याचप्रमाणे संबंधित सहायक बदलीने ज्या विभागात रुजू झालेला आहे त्या विभागाने देखिल अशा सहायकाच्या विभागीय विषयांबाबत या विभागास वेळीच अवगत करणे ही जबाबदारी संबधित विभागाची राहील.

तसेच बदली झालेला जो सहायक, कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीच्या विभागीय अर्हता परीक्षेस यापूर्वी बसून अनुत्तीर्ण झालेला आहे व ज्याचे सदर परीक्षेचे सर्व विभागीय विषय किंवा काही विभागीय विषय सुटलेले नाहीत, अशा सहायकाने पुन्हा परीक्षेस बसताना तेच (पूर्वीच्या विभागाचेच) विभागीय विषय घेवून परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील सूचना उपरोक्त परीक्षेस बसणाऱ्या संबंधित सहायकांच्या निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(वि.द.आठवले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

*सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,

सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा)

निवडनस्ती

(* पत्राने)